# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ८२ वी बैठक दिनांक २२ जानेवारी २०१४

### ठराव

मा. ना. शशिकांत शिंदे, मंत्री, जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ८२ वी बैठक दि. २२ जानेवारी २०१४ रोजी दालन क्र. ०३४, तळमजला, विधानभवन, मुंबई येथे संपन्न झाली.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य, विशेष निमंत्रित, सदस्यांचे प्रतिनिधी व निमंत्रित उपस्थित होते.

**सन्माननीय सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. ना. शशिकांत शिंदे | ... | मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) व अध्यक्ष |
| २. | मा. श्री. वल्लभ बेनके | ... | विसस व उपाध्यक्ष |
| ३. | मा. इंजि.ए.बा.पाटील | ... | प्रधान सचिव (जप्र व वि) व सदस्य |
| ४. | मा. श्रीमती मालिनी शंकर | ... | प्रधान सचिव (जव्य व लावि) व सदस्य |
| ५. | इंजि. शि.मा. उपासे | ... | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

**नियामक मंडळाच्या सदस्यांचे प्रतिनिधी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. नं. वि. पाटील | ... | अवर सचिव<br>(अपर मुख्य सचिव (वित्त) व सदस्य यांचे प्रतिनिधी) |

**निमंत्रित अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | इं. च.आ. बिराजदार | ... | मुख्य अभियंता (विप्र), पुणे |
| २. | इ. अ. वा. सुर्वे | ... | मुख्य अभियंता (जसं), पुणे |

बैठकीच्या सुरुवातीस कार्यकारी संचालक व सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे स्वागत केले. तद्नंतर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आले.

**"मान्य"**

**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ८२ वी बैठक दिनांक २२ जानेवारी २०१४

ठराव

**ठराव क्र. ८२/१**

"दि.३०/१०/२०१३ रोजी संपन्न झालेल्या नियामक मंडळाच्या ८० व्या बैठकीत पारीत केलेल्या ठरावांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल नियामक मंडळाच्या अवलोकनार्थ सादर केला असल्याने या विषयाचे नियामक मंडळाने अवलोकन केले आहे."

**ठराव क्रमांक ८२/२**

"ठराव करण्यात येतो की, दि.२१/११/२०१३ रोजी संपन्न झालेल्या नियामक मंडळाच्या ८१ व्या बैठकीत पारित करण्यात आलेले ठराव कायम करण्यात येत आहेत."

**ठराव क्र. ८२/३**

"ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचे अधिपत्याखालील न्यायालयीन प्रकरणाचे संदर्भात दि.०१-०७-२०१० पासून कायदा समिती कार्यरत आहे. सदर गठित कायदा समिती व तद्नंतर कामाच्या आवश्यकतेनुसार कायदा समितीचे केलेले पुनर्गठन व कार्यकक्षा आणि कार्यपध्दती या विषयाचे नियामक मंडळाने अवलोकन केले आहे."

**ठराव क्र. ८२/४**

"ठराव करण्यात येतो की, महामंडळांतर्गतच्या प्रकल्पाचे पुनर्वसन विषयक प्रकरणी तसेच पर्यायी जमीनीचे प्रकरणी न्यायालयात दाखल झालेल्या तसेच भविष्यात दाखल होणा-या दाव्यात महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळास पक्षकार केलेले नसल्यास स्वत:हून पक्षकार होणेबाबत कार्यकारी संचालक यांचे मंजूरीने प्राथम्याने कार्यवाही करण्याबाबतचा नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्र.८२/५**

"ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या ताब्यातील पिंगळी ल. पा. तलावासाठी मौजे दहिवडी, ता. माण येथील गट क्र. ४९६ मधील २ आर संपादित जागेची चालू मुल्यांकनानुसार होणारी किंमत अर्जदार संस्थेकडून महामंडळास मिळण्याच्या अटीवर जिल्हाधिकारी, सातारा यांचेकडे वर्ग करुन त्यांचेमार्फत ही जमीन ग्रामपंचायत गोंदवले बु.// या ग्रामपंचायतीस सार्वजनिक नळपाणी पुरवठा योजना विहिर खोदाईसाठी देणेबाबत नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ८२ वी बैठक दिनांक २२ जानेवारी २०१४

**ठराव क्र.८२/६**

**"ठराव करण्यात येतो की, खडकवासला प्रकल्पाच्या वितरीका क्र.३० ची लघुवितरीका क्र.२ चे एकूण सिंचनक्षेत्र २३०.८७ हे. इतके असून त्यापैकी १७२.८५ हेक्टर इतके क्षेत्र दौंड नगरपरिषद हद्दीत आल्याने व त्या भागात १०० टक्के नागरीकरण झाल्याने या वितरीकेचे शहर हद्दीतील संपादीत ५.४१ हेक्टर क्षेत्र दौंड नगरपरिषदेकडे वर्ग करण्याची जिल्हाधिकारी यांनी शिफारस केली आहे. खडकवासला प्रकल्पाच्या मंजुर अहवालातील तरतुदी पेक्षा ८.४० अघफू. जादा पाणी बिगरसिंचनासाठी वळविल्याने प्रकल्पाच्या प्रकल्पीय सिंचनक्षमतेत २३४८३ हेक्टर कपात करावी लागणार आहे ही बाब विचारात घेता दौंड नगरपरिषद हद्दीतील वितरीका क्रं. ३० ची लघुवितरीका क्रं.२ च्या सा.क्र. १९६७ ते ४९७५ मीटर या लांबीतील संपादित क्षेत्र ५.४१ हेक्टर सध्या अथवा भविष्यात जलसंपदा विभागास आवश्यक नसल्याने सदर जमिन सार्वजनिक हितास्तव चालू मुल्यांकनानुसार होणारी किंमत महामंडळास जमा करण्याच्या अटीस आधीन राहुन ५.४१ हेक्टर जागा जिल्हाधिकारी यांचेकडे वर्ग करण्यांस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. "**

**ठराव क्र. ८२/७**

**"ठराव करण्यात येतो की, भामा आसखेड प्रकल्प व चासकमान प्रकल्पांचे ज्या प्रकल्पग्रस्तांनी पूर्वी ६५ टक्के रक्कम न भरता पर्यायी जमीन नाकारली आहे परंतु आता पर्यायी जमीन मिळणेकरीता नव्याने ६५% रक्कम भरुन घेणेबाबत मा. उच्च न्यायालयात दावे दाखल केले आहेत अशा सद्य:स्थितीत दाखल सर्व दाव्यांमध्ये तसेच या दोनही प्रकल्पांच्या अशाच स्वरुपाच्या भविष्यात दाखल होणा-या दाव्यांमध्ये महामंडळाने स्वत:हून सहभागी होण्यासाठी व त्यासाठी महामंडळाचे वतीने बाजू मांडण्यासाठी ॲड श्री. नितीन देशपांडे, सिनियर वकील यांची नियुक्ती करण्यास व त्यांना विधी शुल्काकरिता एकत्रित रक्कम अनुक्रमे रु. २.०० लक्ष व रु. १.०० लक्ष तसेच अनुषंगिक इतर किरकोळ खर्चाची प्रत्यक्षात झालेल्या खर्चाप्रमाणे प्रतिपुर्ती करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

तद्नंतर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने कार्यकारी संचालक व सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**"मान्य"**

**(इंजि. शि. मा. उपासे)**
**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**(मा. ना. श्री. शशिकांत शिंदे)**
**मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**